एव्हाना सागर पूर्णपणे चक्रावून गेला होता .दीपालीच्या हातून अपघात  होतो काय , एक माणूस त्यामुळे गटारात पडतो काय आणि काही तासांनी तो चक्क भूत बनून घरी येतो काय . बर एकटा नाही येत , बरोबर स्वर्गवासी श्री रानडे काकांनाहि सोबत घेऊन य्रतो . हे सगळंच जरा  अनाकलनीय आणि फिल्मी वाटत होतं त्याला . तो त्या दोघांना थांबायला सांगून भामभावलेल्या अवस्थेतच पाणी पिउन येतो म्हणून स्वयंपाकघरात पळाला .हे भूत वगैरे सगळं परीकथेत , गोष्टीत ठीक वाटतं पण आज हे असे दोघे भूत म्हणून चक्क आपल्याच  घरात आलेत !!त्याचं मन मानत नव्हत , ते भूत वगैरे कोणी असतील ह्यावर त्याचा अजिबात विश्वास नव्हता .सत्य काय ते शोधायचंच ह्याच आवेशात तो बाहेर आला . त्याला एक युक्ती सुचली होती . तो रानडे काकांना  म्हणाला , "रानडे काका आत्ता दोन तासांपूर्वीच रानडे काकूंना  mild heart attack येउन गेला , त्यांना हॉस्पिटल मध्ये दाखल करून आत्ताच आलोय तेव्हां काय हवंय तुम्हाला ते पटकन सांगा , जेवून परत काकूंकडे जायचंय ."
हे ऐकल्याबरोबर रानडे काका जगाचे उठले आणि रडायला लागले ..."काय झालं हिला ? कुठे आहे ती ? कोणत्या हॉस्पिटल मध्ये ? मला घेऊन चल तिच्याकडे , चल लवकर आत्ताच्या आत्ता ." एव्हाना ते दामले गृहस्त हि चांगलेच हबकलेले दिसत होते . ह्याच परिस्थितीचा फायदा घेत  सागर , रानडे काकांना  समजावत म्हणाला " अहो काका तुम्ही आता भूत आहात , तुम्हाला कश्या ओळखतील काकू ?". इतका वेळ भूताच सोंग करणाऱ्या काकांना राहवलं नाही .ते लगेच म्हणाले "अरे भूत बित काय घेऊन बसलास , चल आपण जाऊ आधी हॉस्पिटल मध्ये . आताच माझं बोलणं झालं काही तासान पूर्वी तेव्हां बरी होती . असं अचानक काय झालं बुवा एकाएकी ?" रानडे काका चिंतेने जवळ जवळ रडायचेच बाकी होते .त्यांची अवस्था बघून ते दामले हि गोंधळलेले दिसत होते . भूत बनण्याचे आपले नाटक उघडकीस आले म्हणून ओशाळले हि होते . सागरला हि मनातून विचित्र वाटत होतं . आपण चक्क खोटं बोललो ..असो . त्याने काकांना धीर देत सांगितले "अहो काका sorry , पण काकू ठीक आहेत . घरीच आहेत . त्यांना काही झालं नाहीये . तुम्ही हे भूत बनण्याचे सोंग का करताहात हे शोधून काढण्यासाठी मी हि थोडं नाटक केलं ." हे ऐकून काकांचा चेहेरा निवळला . ते थोडे relax झाले पण  गपकन सोफ्यावर बसले . सागर ने त्यांना पाणी आणून दिले . थोडेसे शांत झाल्यावर ते त्यांच्या भुताच्या रोल विषयी सांगू लागले . हे इतकं सारं चालू असताना देखील दिपाली मात्र शांत झोपली होती बेडरूम मध्ये. मगाशी सागर ने दिलेल्या गोळीचा प्रभाव तिच्यावर अजूनही होता .

"दीपालीच्या स्कूटर ने जेव्हां त्या गृहस्ताला उडवले तेव्हा मी तिथेच होतो , medical च्या दुकानात" ..काका सांगू लागले ." दीपालीच्या स्कूटरला धडकून हे गृहस्त खाली गटारात पडले ,तोल जाऊन ,पण दिपाली मात्र ह्यांच्या सारख्या म्हातार्या माणसाचा विचार न करता तडक स्कूटर उचलून पळून गेली ." काका हे सगळे दुकानात उभे राहून बघत होते . दिपाली त्यांच्या शेजारी राहत होती आणि त्यांना ती त्यांच्या मुलीसारखी होती . त्यांना वाईट वाटले. तिचे हे असे वागणे त्यांना अयोग्य वाटले . दामले गरीब होते , वयस्कर होते म्हणून त्यांनी complaint वगैरे  केली नाही ,हेच जर दुसरा कोणी असता तर त्याने नक्कीच पोलिसात तक्रार केली असती .काकांनी  दीपालीला थोडीशी समज द्यायचे

ठरवले , एक  नागरिक म्हणून आपल्या कर्तव्याची जाणीव करून द्यायचे ठरवले .सागरला खरं तर सांगावस वाटत होतं कि ती घाबरून पळून आली , बेफिकीर होती म्हणून नव्हे पण काका बोलतच राहिले .

दुकानातून एका बाटलीत  पाणी घेत ते त्या गृहस्तानपाशी आले आणि त्यांना उठवत त्याने त्यांचे हात तोंड धुवायला पाणी दिले . प्यायला हि थोडे पाणी दिले . ते गृहस्त होते दामले . तिथे जवळच राहत होते आणि एकटेच होते . एक मुलगा होता . तो हि शहराबाहेर नोकरी निमित्त आणि बायको आजारी , बिछान्याला खिळलेली . तिच्याच साठी औषध आणायला जात असताना हा अपघात घडला . आज ते तसेच पडून राहिले असते तर त्यांच्या बायकोला कळले हि नसते कुठे गेले दामले. बिचारी वांट बघत बसली असती दाम्ल्यांची . ह्याच गोष्टीची काकांना दीपालीला जाणीव करून द्यायची होती . कोणाच्या घरची परिस्थिती कशी असेल काय माहिती . असं पळून जाऊन कस चालेल ?दामले अजून उठू शकत नव्हते .आणि रानडे काकांना त्यांना उठवणे झेपत नव्हते .तितक्यात एक पोलिस इन्स्पेक्टर तिथून गाडीवरून जात असताना त्याने काकांची धांदल पाहून गाडी थांबवली , दामल्यांना उठवले , त्यांना कुठे लागले का ते बघितले आणि समोरच्याच दवाखान्यात घेऊन गेले . तेव्हांच काकांच्या डोक्यात हा भुताचा प्लान आला आणि त्याने त्या इन्स्पेक्टर ला हि आपल्या नाटकात सामील होण्यास विनंती केली . नुकतीच duty संपवून घरी जात असणारे हे  इन्स्पेक्टर हि ह्या नाटकात सामील होण्यास लगेच तयार झाले. ह्या नाटक मूळे कोणाला काही बोध द्यायचा असेल तर का नाही असा त्यांनी हि विचार केला. असं ठरलं कि पोलिस रानडे काकूंना काकांच्या अपघाताची बातमी देणार  .काकांनी काकूंना आधीच ह्या नाटकाची कल्पना दिली होती . काकुंनीही सगळं  timing अगदी  perfect manage केलं . आणि हे सगळं नाटक ठरलं. त्या प्रमाणे दामले आणि रानडे काका भूत बनून दीपालीच्या घरी आले . दिपाली रानडे काकांची शेजारी त्यामुळे तिचा पत्ता मिळायला काहीच अवघड नव्हतं . "ohh तर हे असं आहे सगळं !!" सागर म्हणाला .आता पुढे काय ?सागरला तर त्यांचे हे गुपित कळले होते . त्याला आठवलं तो दीपालीला किती सांगत होता कि भेल वाल्याच्या गल्ली पाशी जाऊन बघून येतो पण ती काही तयार होईना . सागरने थोडा विचार केला आणि काकांना म्हणाला "काका आपण हे नाटक असंच पुढे नेऊ . पूर्ण करू . दीपालीला तिच्या कर्तव्याची जाणीव करून देऊ “ .तोही आता  ह्या नाटकात सामील होता. दीपालीला उठवायला तो आत गेला .